नागपूर
पत्रिका






गौरी काळे नृत्य सादर करीत असून, आविश्वार दारव्हेकरचा नाट्यप्रवेश, अमोल पालेकर बाल रंजनच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा देताना तर राधिका पेंडसे मुक्ताई सादर करताना.

### १६ व्या वर्धापनदिनानिमित्त

# अमोल पालेकर, राजाराम शिंदे यांच्या बालरंजनला शुभेच्छा

नागपूर, ता. ४ (प्रतिनिधी) – मार्गदर्शन करण्यासाठी वय, अनुभव आणि तपश्चर्या आवश्यक असते. यातली एखादी गोष्ट जरी आपल्याकडे असती तरी मी मार्गदर्शन केले असते. पण कावण हा आपला प्रांत नाही. नाटकांवर आणि लहान मुलांवर प्रेम करणारा रसिक म्हणून मी आज बालरंजनच्या कलावंतांना त्यांच्या भावी यशासाठी शुभेच्छा देत आहे, असे अमोल पालेकर यांनी बालरंजनच्या १६ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलताना सांगितले.

विसासंघाच्या गडकरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. भा. नाट्य परिषदेचे अध्यक्ष राजाराम शिंदे होते. अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात आपण नागपुरात केली. अध्यक्ष झाल्यानंतर पहिला सत्कार नागपुरात झाला आणि कलावंतांचा पहिला मेळावाही नागपुरातच होतो आहे, हा त्रिवेणी संगम असल्याचे शिंदे म्हणाले.

बालरंजनने गेल्या १५ वर्षात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. कमी वेळेत शिस्तबध्द व देखणा कार्यक्रम सादर केल्याबद्दल त्यांनी संस्थेचे कौतुकही केले. कार्यक्रमाची सुरुवात स्मिता खर्डेनवीस, देवयानी पेंडसे, अविनाश वेखंडे, सदानंद पेंडसे, विजय वेखंडे, रवी खाडे, शशिकांत शेंबेकर यांच्या स्वागत गीताने झाली.

राजाराम शिंदे यांनी नटराजाचे पूजन केल्यावर राधिका वैद्यने संस्कृत प्रार्थना सादर केली. राधिका पेंडसे (नाट्य प्रवेश-मुक्त), आविश्वार दारव्हेकर (नाट्यप्रवेश शिवाई) गौरी काळेने बहारदार नृत्य सादर केले. प्रभाकर चांदेकर यांनी संस्थेचा परिचय करून दिला तर संजय पेंडसे (सूत्रधार) यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. वरदा गोखलेने अमोल पालेकर तर आसावरी पखोटेने राजाराम शिंदे यांचे स्वागत केले. रुपश्री रत्नपारखी व राजेंद्र हरकरेने कार्यक्रमाचे संचालन केले. चंद्रशेखर चौधरी, विलास खरे, संयोगिता जोशी यांनी श्रीरंग गद्रे, रविंद्र भुते, सचिन खर्डेनविस, माणिक वऱ्हाडपांडे, अपर्णा देशमुख, दिपक तांबोळी, प्रसन्न शेंबेकर, प्रशांत चेंडके, जयदीप भालेराव, अंजली डाके यांच्या सहकार्याने या देखण्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.